दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ४७/२०२३

निशाण क्रमांक ४० / क सोबत

वि. प. तर्फे वकील जी. पी. पाटील यांचे मार्फत अर्जदार तर्फे साक्षीदार क्रमांक १ लता जयराम चव्हाण हिचा उलट तपास सुरु

१२. आप्पा हे आमच्या घराण्यातील मुळ पुरुष आहेत. त्यांना बायाक्का ही पत्नी आहे. आप्पा हे दिनांक २/१२/१९८४ साली मयत झाले. बायाक्का ही दिनांक १८/५/१९९९ ला मयत झाली. आप्पा व बायाक्का यांना दत्तु, जिवबा, जयराम, तुकाराम, कलाप्पा व तुळसाबाई अशी मुले होती. त्यापैकी जिवबा सोडून इतर लोक मयत आहेत. तुळसाबाई ही सन १९७९ साली मयत झाली. तुळसाबाई चा मृत्यु दाखला या कामात दाखल केलेला नाही. त्याचप्रमाणे तीची मृत्युची तारीख देखील प्रकरणात नमूद केलेली नाही. कलाप्पाचे याचे लग्न झाले होते. कलाप्पा व त्याचे पत्नीचे पटत नसल्याने त्यानी घटस्फोट घेतलेला होता याबाबत मला माहिती नाही. त्यांना मुळ बाळ झाले नव्हते याबाबत मला माहिती नाही. आप्पा व बायाक्का नी तुळसाबाईचे लग्न लावून दिलेले होते. तुळसाबाई लग्न झाल्यानंतर काही दिवसातच मयत झाली. तुळसाबाई मयत झाल्यानंतर तीच्या पतीने जांबोटी महिलेशी लग्न केले. हे म्हणणे खरे नाही की, तुळसाबाईच्या पतीने जांबोटीशी लग्न केल्यामुळे जांबोटी पासून त्याला भरमाणा, उत्तम, सुमन व मलप्रभा अशी मुले झाली. हे म्हणणे खरे नाही की, तुळसाबाईचा आप्पा याच्या घराण्याशी कुठलाही संबंध राहिलेला नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, आप्पा याच्या मृत्युनंतर जिवबा यांनी दिनांक २४/१२/१९८५ साली गट नंबर २७३, ४४४, ४४८, ६७७, १२८०, ६८१ व ५९६ यावर त्याचे नाव लागण्याकरीता अर्ज दिलेला होता. हे मला माहित नाही की, त्याप्रमाणे तलाठयाने नोटीस पाठविल्या होत्या. हे मला माहित नाही की, नोटीसीला काहीही आक्षेप न आल्याने त्याप्रमाणे नांव नोंदविण्यात आले. हे म्हणणे बरोबर आहे की, वारस म्हणून जिवबा याची एकत्र कुंटूब प्रमुख म्हणून त्याची नोंद झाली. हे म्हणणे बरोबर आहे की, कालांतराने आप्पाचे मुलाचे

कुंटूंब वाढत गेले. हे म्हणणे खरे आहे की, कुंटूंब वाढल्यामुळे कुंटूबात किरकोळ वाद होत होते. प्रत्येक जन आप आपल्या ताब्यातील जमीन कसतात. फेरफार वर आजपर्यंत अपील दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकूर खोटा नमूद केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या अर्जा मध्ये खोटे वारस नमूद केलेले आहेत व खोटी माहिती लिहलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जा मध्ये केलेली मागणी ही खोटी व चुकची आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वशांवळ चुकीची दाखविलेली आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक १०/०२/२०२६

सही/-

( न.श्री.पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
**गडहिंग्लज**